॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



**विद्यार्थी विकास विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/१४/वि.वि./ १३२ /२०२४ दि.२६/०६/२०२४

**ई-पत्र**

**प्रति,**

१) मा. प्राचार्य/ संचालक, कबचौउमविशी संलग्नीत महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था.

२) मा. संचालक/ विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा - विभाग.

**विषय:- रक्तदाता सुची तयार करणेबाबत..**

महोदय / महोदया

श्री. अमोल पाटील, व्य.प.सदस्य कबचौउमवि, जळगाव यांच्या संकल्पनेनुसार काही वर्षापासून देशात आणि जगभरातही मोठया प्रमाणात कोरोना, डेंगू, कॅन्सर, थॅलेसेमिया इ. सह विविध आजारांचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढते आहे. अशा वेळी अतिरिक्त रक्त आणि त्यांच्या घटकांची संबंधित रुग्णांना तातडीने आवश्यकता असते. आवश्यक त्या ग्रुपचे रक्त अथवा घटक रक्तपेढीत उपलब्ध नसल्यास संबंधितांना सक्षम रक्तदाता शोधण्यासाठी शोधाशोध करावी लागते. रक्तपेढयांकडून होणारा पुरवठा अणि त्यांच्याकडे होणारी मागणी यात खूप तफावत असते अशावेळी रक्तदाता सूचीचा फार मोठा उपयोग होतो.

प्रस्तुत अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थी विकास विभागातर्फे १ लक्ष रक्तदात्यांची सुची तयार करण्याचे योजिले आहे. प्रामुख्याने विद्यापीठ परिक्षेत्रातील महाविद्यालय व प्रशाळांतील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची नावे त्यांच्या इच्छेनुसार नोंदवली जाणार असून या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यापीठ आणि महाविद्यालय यांचा थेट सहभाग हा आरोग्यसेवेशी जोडला जाणार आहे. भविष्यात रक्ताचा तुटवडा भासणार नाही त्या करीता रक्तदाता सूची तयार करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची व विद्यार्थ्यांची माहिती खालील दिलेल्या गुगल फॉर्म लिंक द्वारे भरुन **दि. १० जुलै २०२४** पर्यत पाठवावी व सदरच्या उपक्रमात जास्तीच्या संख्येने सहभागी होण्यासाठी प्राध्यापक, विद्यार्थी - विद्यार्थीनी इ. यांना आपल्या स्तरावर सुचना देण्यात यावी, ही नम्र विनंती.

*****Link for Google Form:**

https://forms.gle/fBoJEC9DfGhoFuYB7

आपला विश्वासू,

**(डॉ.जयेंद्र दि. लेकुरवाळे)**
**संचालक, विद्यार्थी विकास विभाग**

**प्रत-**

१) विभागप्रमुख, कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.

२) विभागप्रमुख, प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.

३) विभागप्रमुख, कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव.

४) श्री. अमोल नाना पाटील, व्य.प.सदस्य, कबचौउमवि, जळगव